असा. क्र. ७ रजिस्टर्ड नं. एमएच/एमआर/साऊथ-२२९/२००६-०८

# महाराष्ट्र शासन राजपत्र

**असाधारण**

**प्राधिकृत प्रकाशन**

**बुधवार, जानेवारी १४, २००९/पौष २४, शके १९३०**

**स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.**

## भाग चार

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

**अनुक्रमणिका**

पृष्ठे

**सन २००९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७.**—मुंबई महानगरपालिका अधिनियम, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९, नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८ आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ यांमध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम .. ५४-६१

दिनांक १४ जानेवारी २००९ रोजी मा. राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**ह. बा. पटेल,**
सचिव, महाराष्ट्र शासन,
विधी व न्याय विभाग.

---

### सन २००९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७.

(मा. राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर **महाराष्ट्र शासन राजपत्रात** दिनांक १४ जानेवारी २००९ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

**मुंबई महानगरपालिका अधिनियम, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९, नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८ आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ यांमध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम.**

१८८८ चा मुंबई ३. १९४९ चा मुंबई ५९. १९५० चा मध्य प्रांत व वऱ्हाड २. १९६५ चा महा. ४०.

**ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, मुंबई महानगरपालिका अधिनियम, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९, नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८ आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ यांमध्ये आणखी सुधारणा करणे इष्ट आहे ; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या एकोणसाठाव्या वर्षी, याद्वारे पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—



[**किंमत :** रुपये १८.००]

प्रकरण एक

**प्रारंभिक.**

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

१. (१) या अधिनियमास, महाराष्ट्र महानगरपालिका आणि नगरपरिषदा (सहावी सुधारणा) अधिनियम, २००८ असे म्हणावे.

(२) तो, राज्य शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, नेमून देईल अशा दिनांकास अंमलात येईल आणि वेगवेगळ्या प्रयोजनांसाठी वेगवेगळे दिनांक नेमून देता येतील.

प्रकरण दोन

**मुंबई महानगरपालिका अधिनियमाची सुधारणा.**

सन १८८८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम ३७ ची सुधारणा.

२. मुंबई महानगरपालिका अधिनियम (यात यापुढे, या प्रकरणात, ज्याचा निर्देश " मुंबई महानगरपालिका अधिनियम " असा करण्यात आला आहे), याच्या कलम ३७ मध्ये, पोट-कलम (२) नंतर, पुढील पोट-कलम समाविष्ट करण्यात येईल :— १८८८ चा मुंबई ३.

" (२अ) अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती किंवा, यथास्थिती, नागरिकांचा मागासवर्ग यांच्याकरिता राखीव असलेल्या महापौरांच्या पदासाठी निवडणूक लढविण्यास इच्छुक असलेल्या प्रत्येक व्यक्तीने, नामनिर्देशनपत्राबरोबर, महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम, २००० याच्या तरतुदींना अनुसरून सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले जातीचे प्रमाणपत्र व पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक असेल.". २००१ चा महा. २३.

सन १८८८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३ यामध्ये कलम २००अ समाविष्ट करणे.

३. मुंबई महानगरपालिका अधिनियमाच्या कलम २०० नंतर, पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :—

मालमत्ता कराची रक्कम आगाऊ भरण्यातून सूट.

" **२००अ.** या अधिनियमामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, मालमत्ता कर देण्याकरिता मुख्यत: पात्र असणारी कोणतीही व्यक्ती, असा कर, त्या प्रयोजनाकरिता बिलात विनिर्दिष्ट केलेल्या दिनांकापूर्वी भरत असेल किंवा असा कर, संपूर्ण वर्षाकरिता आगाऊ भरत असेल तर, तिला महानगरपालिका, सर्वसाधारण आदेशाद्वारे निर्धारित करील अशा दराने मालमत्ता कर भरण्यातून सूट देण्यात येईल आणि मालमत्तेच्या वापरकर्त्यांच्या वेगवेगळ्या वर्गांकरिता अशी सूट देण्याचे वेगवेगळे दर विनिर्दिष्ट करता येतील.".

४. मुंबई महानगरपालिका अधिनियमाच्या कलम २१६ नंतर, पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :— सन १९८८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३ यामध्ये कलम २१६ समाविष्ट करणे.

" **२१६अ.** या अधिनियमाच्या कलम २१६ किंवा इतर कोणत्याही तरतुदींमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, महानगरपालिकेस, जी व्यक्ती किंवा व्यक्तींचा वर्ग महानगरपालिकेने निश्चित केलेल्या वेळापत्रकानुसार, मालमत्ता कराच्या थकबाकीची रक्कम प्रदान करील. अशा, मालमत्ता कर प्रदान करण्यास प्रथमत: पात्र असलेल्या कोणत्याही व्यक्तीला किंवा व्यक्तींच्या वर्गाला, राज्य शासन मान्य करील अशी सूट देता येईल.". कराची थकबाकी प्रदान करण्यातून सूट देण्याचा महानगरपालिकेचा अधिकार.

प्रकरण तीन

**मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ याची सुधारणा.**

१९४९ चा मुंबई ५९. ५. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ (यात यापुढे, या प्रकरणात, ज्याचा निर्देश " प्रांतिक महानगरपालिका अधिनियम " असा करण्यात आला आहे), याच्या कलम ४ मध्ये, पोट-कलम (१) मध्ये, खंड (ब अ) ऐवजी, पुढील खंड दाखल करण्यात येतील :— सन १९४९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५९ याच्या कलम ४ ची सुधारणा.

" (ब अ) प्रभाग समिती ;

(ब ब) महापौर ; आणि ".

६. प्रांतिक महानगरपालिका अधिनियमाच्या कलम १९ मध्ये, पोट-कलम (१अ) नंतर, पुंढील पोट-कलम समाविष्ट करण्यात येईल :— सन १९४९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५९ याच्या कलम १९ ची सुधारणा.

" (१ब) अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती किंवा, यथास्थिती, नागरिकांचा मागासप्रवर्ग यांच्याकरिता राखीव असलेल्या महापौराच्या पदासाठी निवडणूक लढविण्यास इच्छुक असलेल्या प्रत्येक व्यक्तीने, नामनिर्देशनपत्राबरोबर, महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम, २००० याच्या तरतुदींना अनुसरून सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले जातीचे प्रमाणपत्र व पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक असेल.". (२००१ चा महा. २३.)

७. प्रांतिक महानगरपालिका अधिनियमाच्या कलम १४० नंतर, पुढील कलमे समाविष्ट करण्यात येतील :— सन १९४९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५९ या मध्ये कलम १४०अ आणि १४०ब समाविष्ट करणे.

मालमत्ता कराची रक्कम आगाऊ भरण्यातून सूट.

" **१४०अ.** या अधिनियमामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, मालमत्ता कर देण्याकरिता मुख्यतः पात्र असणारी कोणतीही व्यक्ती, असा कर, त्या प्रयोजनाकरिता बिलात विनिर्दिष्ट केलेल्या दिनांकापूर्वी भरत असेल किंवा असा कर, संपूर्ण वर्षाकरिता आगाऊ भरत असेल तर, तिला महानगरपालिका, सर्वसाधारण आदेशाद्वारे निर्धारित करील अशा दराने मालमत्ता कर भरण्यातून सूट देण्यात येईल आणि मालमत्तेच्या वापरकर्त्यांच्या वेगवेगळ्या वर्गांकरिता अशी सूट देण्याचे वेगवेगळे दर विनिर्दिष्ट करता येतील.

पारिस्थितिकीयदृष्ट्या लाभदायक योजनेची अंमलबजावणी करण्याकरिता मालमत्ता करातून सूट किंवा परतावा.

**१४०ब.** या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, या कलमाच्या प्रयोजनार्थ राज्य शासन किंवा महानगरपालिका ठरवून देईल अशी पारिस्थिकीयदृष्ट्या लाभदायक योजनेची अंमलबजावणी करण्यात येत असेल अशा जमिनीच्या आणि इमारतींच्या बाबतीत महानगरपालिका, सर्वसाधारण वा विशेष आदेशाद्वारे, निर्धारित करील अशा दराने मालमत्ता कर भरण्यातून सूट किंवा परतावा देईल आणि पारिस्थितिकीयदृष्ट्या लाभदायक योजनेची अंमलबजावणी करण्याकरिता आणि ती चालू ठेवण्याकरिता उपाययोजनांची मर्यादा लक्षात घेऊन, सूट किंवा परतावा देण्याचे वेगवेगळे दर निर्धारित करता येतील.

**स्पष्टीकरण.—** या कलमाच्या प्रयोजनार्थ, " पारिस्थितिकीयदृष्ट्या लाभदायक योजना " या शब्दप्रयोगात पावसाचे पाणी साठवण्याची व्यवस्था, कृमी मिश्र खत, सौर ऊर्जेचा वापर आणि इतर अपारंपरिक ऊर्जास्रोत, सांडपाण्याचे पुनश्चक्रण आणि पुनर्वापर किंवा पर्यावरणानुकूल आणि पारिस्थितीकीय लाभदायक गृहनिर्माण यांना चालना देणारी किंवा महानगरपालिका किंवा राज्य शासन यांनी निश्चित केलेली यासारखी कोणतीही योजना, या गोष्टींचा समावेश होतो. ".

सन १९४९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५९ यामध्ये कलम १५२-१अ समाविष्ट करणे.

**८.** मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ याच्या कलम १५२ नंतर, पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :—

कराची थकबाकी प्रदान करण्यातून सूट देण्याचा महानगरपालिकेचा अधिकार.

" **१५२-१अ.** या अधिनियमाच्या कलम १५२ किंवा इतर कोणत्याही तरतुदींमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, महानगरपालिकेस, जी व्यक्ती किंवा व्यक्तींचा वर्ग महानगरपालिकेने निश्चित केलेल्या वेळापत्रकानुसार, मालमत्ता कराच्या थकबाकीची रक्कम प्रदान करील. अशा, मालमत्ता कर प्रदान करण्यास प्रथमतः पात्र असलेल्या कोणत्याही व्यक्तीला किंवा व्यक्तींच्या वर्गाला, राज्य शासन मान्य करील अशी सूट देता येईल.".

## प्रकरण चार

## नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८ याची सुधारणा.

सन १९५० चा मध्य-प्रांत व वऱ्हाड अधिनियम क्रमांक २ याच्या कलम ६ ची सुधारणा.

**९.** नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८ (यात यापुढे, या प्रकरणात, ज्याचा निर्देश " नागपूर महानगरपालिका अधिनियम " असा करण्यात आला आहे). १९५० चा मध्य-प्रांत व वऱ्हाड २.

याच्या कलम ६ मधील, खंड (ब) नंतर पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :—

" (ब-१) प्रभाग समिती ; ".

१०. नागपूर महानगरपालिका अधिनियमाच्या कलम २० मध्ये, पोट-कलम (२) नंतर, पुढील पोट-कलम समाविष्ट करण्यात येईल :— सन १९५० चा मध्य-प्रांत व वऱ्हाड अधिनियम क्रमांक २ याच्या कलम २० ची सुधारणा.

" (२ अ) अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती किंवा, यथास्थिति, नागरिकांचा मागास प्रवर्ग यांच्याकरिता राखीव असलेल्या महापौराच्या पदासाठी निवडणूक लढविण्यास इच्छुक असलेल्या प्रत्येक व्यक्तीने, नामनिर्देशनपत्राबरोबर, महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम, २००० याच्या तरतुदींना अनुसरून सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले जातीचे प्रमाणपत्र व पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक असेल. ". २००१ चा महा. २३.

११. नागपूर महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ११८ ऐवजी, पुढील कलमे दाखल करण्यात येतील :— सन १९५० चा मध्य-प्रांत व वऱ्हाड अधिनियम क्रमांक २ यामध्ये कलम ११८ बदली दाखल करणे.

" ११८. या अधिनियमामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, मालमत्ता कर देण्याकरिता मुख्यत: पात्र असणारी कोणतीही व्यक्ती, असा कर, त्या प्रयोजनाकरिता बिलात विनिर्दिष्ट केलेल्या दिनांकापूर्वी भरत असेल किंवा असा कर संपूर्ण वर्षाकरिता आगाऊ भरत असेल तर, तिला, राज्य शासन वा महानगरपालिका या कलमाच्या प्रयोजनासाठी निश्चित करील अशा, पारिस्थितिकीयदृष्ट्या लाभदायक योजनेची अंमलबजावणी करण्यात येत असेल अशा जमिनीच्या आणि इमारतीच्या बाबतीत महानगरपालिका, सर्वसाधारण वा विशेष आदेशाद्वारे, निर्धारित करील अशा दराने मालमत्ता कर भरण्यातून सूट आणि मालमत्तेच्या वापरकर्त्यांच्या वेगवेगळ्या वर्गांकरिता अशी सूट किंवा परतावा देण्याचे वेगवेगळे दर विनिर्दिष्ट करता येतील. मालमत्ता कराची रक्कम आगाऊ भरण्यातून सूट.

११८अ. या अधिनियमामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, या कलमाच्या प्रयोजनार्थ राज्य शासन किंवा महानगरपालिका ठरवून देईल अशी पारिस्थितिकीयदृष्ट्या लाभदायक योजनेची अंमलबजावणी करण्यात येत असेल अशा जमिनीच्या व इमारतीच्या बाबतीत महानगरपालिका, सर्वसाधारण वा विशेष आदेशाद्वारे, निर्धारित करील अशा दराने मालमत्ता कर भरण्यातून सूट किंवा परतावा देता येईल आणि पारिस्थितिकीयदृष्ट्या लाभदायक योजनेची अंमलबजावणी करण्याकरिता आणि ती चालू ठेवण्याकरिता उपाययोजनांची मर्यादा लक्षात घेऊन, सूट किंवा परतावा देण्याचे वेगवेगळे दर निर्धारित करता येतील. पारिस्थितिकीय-दृष्ट्या लाभदायक योजनेची अंमलबजावणी करण्याकरिता मालमत्ता करातून सूट.

**स्पष्टीकरण.**—या कलमाच्या प्रयोजनार्थ, " पारिस्थितिकीयदृष्ट्या लाभदायक योजना " या शब्द प्रयोगात पावसाचे पाणी साठवण्याची व्यवस्था, कृमी मिश्र खत, सौरऊर्जेचा वापर आणि पुनर्वापर करता येण्याजोगी इतर ऊर्जा साधने, सांडपाण्याचे पुनश्चक्रण आणि पुनर्वापर किंवा पर्यावरणानुकूल आणि पारिस्थितीकीय लाभदायक गृहनिर्माण यांना चालना देणारी किंवा महानगरपालिका किंवा राज्य शासन यांनी निश्चित केलेली यासारखी कोणतीही योजना, या गोष्टींचा समावेश होतो.".

सन १९५० चा मध्य-प्रांत व वऱ्हाड अधिनियम क्रमांक २ यामध्ये कलम १६७अ समाविष्ट करणे.

**१२.** नागपूर महानगरपालिका अधिनियमाच्या कलम १६७ नंतर, पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :--

कराची थकबाकी प्रदान करण्यातून सूट देण्याचा महानगरपालिकेचा अधिकार.

" **१६७अ.** कलम १६७ मध्ये किंवा या अधिनियमाच्या अन्य कोणत्याही तरतुदींमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, महानगरपालिकेस, जी व्यक्ती किंवा जे व्यक्तींचे वर्ग, महानगरपालिकेने निश्चित केलेल्या वेळापत्रकानुसार, मालमत्ता कराच्या थकबाकीची रक्कम प्रदान करील, अशा, मालमत्ता कर प्रदान करण्यास प्रथमतः पात्र असलेल्या कोणत्याही व्यक्तीला किंवा व्यक्तींच्या वर्गाला राज्य शासन मान्य करील अशी सूट देता येईल. ".

## प्रकरण पाच

## महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ याची सुधारणा.

सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४० याच्या कलम ९ ची सुधारणा.

**१३.** महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ (यात यापुढे, या प्रकरणात ज्याचा निर्देश " नगरपरिषदा अधिनियम " असा करण्यात आला आहे) याच्या कलम ९ मध्ये, पोट-कलम (१) मध्ये, खंड (ब) मधील, " परिषदेने " या मजकुराऐवजी, " जिल्हाधिकाऱ्याने " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

१९६५ चा महा. ४०.
१९९४ चा महा. ४१.

सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४० यामध्ये कलम ५१-१ब समाविष्ट करणे.

**१४.** नगरपरिषदा अधिनियमाच्या कलम ५१-१अ नंतर, पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :—

सभापतीच्या राखीव पदाकरिता निवडणूक लढविणाऱ्या व्यक्तीने जातीचे प्रमाणपत्र व वैधता प्रमाणपत्र सादर करणे.

" **५१-१ब.** अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती किंवा, यथास्थिति, नागरिकांचा मागास प्रवर्ग यांच्याकरिता राखीव असलेल्या सभापतीच्या पदासाठी निवडणूक लढविण्यास इच्छुक असलेल्या प्रत्येक व्यक्तीने, नामनिर्देशनपत्राबरोबर, महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम, २००० याच्या तरतुदींना अनुसरून सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले जातीचे प्रमाणपत्र व पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक असेल. ".

२००१ चा महा. २३.

१५. नगरपरिषदा अधिनियमाच्या कलम १२७ नंतर, पुढील कलमे समाविष्ट करण्यात येतील :— सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४० यामध्ये कलमे १२७अ व १२७ब समाविष्ट करणे.

" १२७अ. या अधिनियमामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, मालमत्ता कर देण्याकरिता मुख्यतः पात्र असणारी कोणतीही व्यक्ती, असा कर, त्या प्रयोजनाकरिता बिलात विनिर्दिष्ट केलेल्या दिनांकापूर्वी भरत असेल किंवा असा कर संपूर्ण वर्षाकरिता आगाऊ भरत असेल तर, तिला, राज्य शासन वा नगरपरिषद या प्रकल्पाच्या प्रयोजनासाठी निश्चित करील अशा पारिस्थितीकीयदृष्ट्या लाभदायक योजनेची अंमलबजावणी करण्यात येत असेल अशा जमिनीच्या आणि इमारतीच्या बाबतीत नगरपरिषद, सर्वसाधारण वा विशेष आदेशाद्वारे, निर्धारित करील अशा दराने मालमत्ता कर भरण्यातून सूट किंवा परतावा देण्यात येईल आणि मालमत्तेच्या वापरकर्त्यांच्या वेगवेगळ्या वर्गांकरिता अशी सूट किंवा परतावा देण्याचे वेगवेगळे दर विनिर्दिष्ट करता येतील. मालमत्ता कराची रक्कम आगाऊ भरण्यातून सूट.

१२७ब. या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, या कलमाच्या प्रयोजनार्थ राज्य शासन किंवा नगरपरिषद ठरवून देईल अशा शहरातील जमिनीच्या आणि इमारतीच्या बाबतीत पारिस्थितिकीयदृष्ट्या लाभदायक योजनेची अंमलबजावणी करण्यात येत असेल तर, नगरपरिषद, सर्वसाधारण वा विशेष आदेशाद्वारे, निर्धारित करील अशा दराने मालमत्ता कर भरण्यातून सूट किंवा परतावा देण्यात येईल आणि पारिस्थितिकीयदृष्ट्या लाभदायक योजनेची अंमलबजावणी करण्याकरिता आणि ती चालू ठेवण्याकरिता उपाययोजनांची मर्यादा लक्षात घेऊन, सूट किंवा परतावा देण्याचे वेगवेगळे दर निर्धारित करता येतील. पारिस्थितिकीय-दृष्ट्या लाभदायक योजनेची अंमलबजावणी करण्याकरिता मालमत्ता करातून सूट किंवा परतावा.

**स्पष्टीकरण.**—या कलमाच्या प्रयोजनार्थ, " पारिस्थितिकीयदृष्ट्या लाभदायक योजना " या शब्द प्रयोगात पावसाचे पाणी साठवण्याची व्यवस्था, कृमी मिश्र खत, सौरऊर्जेचा वापर आणि पुनर्वापर करता येण्याजोगी इतर ऊर्जा साधने, सांडपाण्याचे पुनश्चक्रण आणि पुनर्वापर किंवा पर्यावरणानुकूल आणि पारिस्थितीकीय लाभदायक गृहनिर्माण यांना चालना देणारी किंवा महानगरपालिका किंवा राज्य शासन यांनी निश्चित केलेली यासारखी कोणतीही योजना, या गोष्टींचा समावेश होतो.".

सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४० यामध्ये कलम १६७अ समाविष्ट करणे.

**१६.** नगरपरिषदा अधिनियमाच्या कलम १६७ नंतर, पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :—

कराची थकबाकी प्रदान करण्यातून सूट देण्याचा नगर परिषदेचा अधिकार.

" **१६७अ.** कलम १६७ मध्ये किंवा या अधिनियमाच्या अन्य कोणत्याही तरतुदींमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, नगरपरिषदेस, जी व्यक्ती किंवा जे व्यक्तींचे वर्ग, नगरपरिषदेने निश्चित केलेल्या वेळापत्रकानुसार, मालमत्ता कराच्या थकबाकीची रक्कम प्रदान करील, अशा, मालमत्ता कर प्रदान करण्यास प्रथमत: पात्र असलेल्या कोणत्याही व्यक्तीला किंवा व्यक्तींच्या वर्गाला राज्य शासन मान्य करील अशी सूट देता येईल. ".

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई

असा. क्र. ९

रजिस्टर्ड नं. एमएच/एमआर/साऊथ-२२९/२००६-०८

# महाराष्ट्र शासन राजपत्र

**असाधारण**

**प्राधिकृत प्रकाशन**

**गुरुवार, फेब्रुवारी १२, २००९/माघ २३, शके १९३०**

**स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.**

## भाग चार

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

### शुद्धिपत्र

**महाराष्ट्र शासन राजपत्र,** असाधारण, भाग चार, दिनांक १४ जानेवारी २००९, पृष्ठ क्रमांक ५४ ते ६१ वर प्रकाशित करण्यात आलेल्या महाराष्ट्र महानगरपालिका आणि नगरपरिषदा (सहावी सुधारणा) अधिनियम, २००८ (२००९ चा महा. ७) यामध्ये,—

(१) पृष्ठ ५६ वर, समास टिपेत, ओळ क्रमांक ४ व ५, मध्ये, " कलम २१६ " **या ऐवजी** " कलम २१६अ " **असे वाचावे** ;

(२) पृष्ठ ५७ वर,—

(एक) ओळ क्रमांक १९ मध्ये, " मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ याच्या " **ऐवजी** " प्रांतिक महानगरपालिका अधिनियमाच्या " **असे वाचावे**.

(दोन) ओळ क्रमांक २९ मध्ये, " असा करण्यात आला आहे) " **या ऐवजी** " असा करण्यात आला आहे), " **असे वाचावे**.



[**किंमत** : रुपये ९.००]

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई

असा. क्र. ७ रजिस्टर्ड नं. एमएच/एमआर/साऊथ-२२९/२००६-०८

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण

प्राधिकृत प्रकाशन

बुधवार, जानेवारी १४, २००९/पौष २४, शके १९३०

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग आठ

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम आणि विधी व न्याय विभागाकडून आलेली विधेयके (इंग्रजी अनुवाद).

In pursuance of clause (3) of article 348 of the Constitution of India, the following translation in English of the Maharashtra Municipal Corporations and Municipal Councils (Sixth Amendment) Act, 2008 (Mah. VII of 2009), is hereby published under the authority of the Governor.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

H. B. PATEL,
Secretary to Government,
Law and Judiciary Department.

---

## MAHARASHTRA ACT No. VII OF 2009.

*(First published after having received the assent of the Governor, in the "Maharashtra Government Gazette", on the 14th January 2009).*

An Act further to amend the Mumbai Municipal Corporation Act, the Bombay Provincial Municipal Corporations Act, 1949, the City of Nagpur Corporation Act, 1948 and the Maharashtra Municipal Councils, Nagar Panchayats and Industrial Townships Act, 1965.

Bom. III of 1888. Bom. LIX of 1949. C.P. and Berar II of 1950. Mah. XL of 1965.

WHEREAS, it is expedient further to amend the Mumbai Municipal Corporation Act, the Bombay Provincial Municipal Corporations Act, 1949, the City of Nagpur Corporation Act, 1948 and the Maharashtra Municipal Councils, *Nagar Panchayats* and Industrial Townships Act, 1965, for the purposes hereinafter appearing; it is hereby enacted in the Fifty-ninth Year of the Republic of India as follows :—

## CHAPTER I

### PRELIMINARY

Short title and commencement.

**1.** (*1*) This Act may be called the Maharashtra Municipal Corporations and Municipal Councils (Sixth Amendment) Act, 2008.

(*2*) It shall come into force on such date as the State Government may, by notification in the *Official Gazette,* appoint, and different dates may be appointed for different provisions of this Act.

## CHAPTER II

### AMENDMENTS TO THE MUMBAI MUNICIPAL CORPORATION ACT

Amendment of section 37 of Bom. III of 1888.

**2.** In section 37 of the Mumbai Municipal Corporation Act (hereinafter, in this Chapter, referred to as " the Mumbai Corporation Act "), after sub-section (*2*), the following sub-section shall be inserted, namely :— Bom. III of 1888.

" (*2A*) Every person desirous of contesting election to the office of the Mayor reserved for the Scheduled Castes, Scheduled Tribes or, as the case may be, Backward Class of Citizens, shall be required to submit, alongwith the nomination paper, Caste Certificate issued by the Competent Authority and the Validity Certificate issued by the Scrutiny Committee in accordance with provisions of the Maharashtra Scheduled Castes, Scheduled Tribes, De-notified Tribes (*Vimukta Jatis)*, Nomadic Tribes, Other Backward Classes and Special Backward Category (Regulation of Issuance and Verification of ) Caste Certificate Act, 2000.". Mah. XXIII of 2001.

Insertion of section 200A in Bom. III of 1888.

**3.** After section 200 of the Mumbai Corporation Act, the following section shall be inserted, namely :—

Rebate in respect of advance payment of tax.

" **200A.** Notwithstanding anything contained in this Act, the Corporation may, by general or special order give such rebate in the payment of property tax, as the Corporation may, from time to time decide, to any person, primarily liable for payment of the property tax, who pays such tax, before the date specified in the Bill for the purpose or, pays such tax for the entire year in advance, and different rates of rebate may be specified for different classes of user of the property.".

Insertion of section 216A in Bom. III of 1888.

**4.** After section 216 of the Mumbai Corporation Act, the following section shall be inserted, namely :—

Power of Corporation to grant rebate for payment of arrears of tax.

" **216A.** Notwithstanding anything contained in section 216 or any other provisions of this Act, the Corporation may, grant such rebate, as may be approved by the State Government, to any person or class of persons, primarily liable for payment of property tax, who pays the amount of arrears of the property tax, as per the schedule of payment fixed by the Corporation.".

## CHAPTER III

### AMENDMENTS TO THE BOMBAY PROVINCIAL MUNICIPAL CORPORATIONS ACT, 1949

Bom. LIX of 1949.

Amendment of section 4 of Bom. LIX of 1949.

5. In section 4 of the Bombay Provincial Municipal Corporations Act, 1949 (hereinafter, in this Chapter, referred to as "the Provincial Municipal Corporations Act"), in sub-section *(1)*, for clause *(BA)*, the following clauses shall be substituted, namely :—

"*(BA)* a Wards Committee ;

*(BB)* a Mayor ; and ".

Amendment of section 19 of Bom. LIX of 1949.

6. In section 19 of the Provincial Municipal Corporations Act, after sub-section *(1A)*, the following sub-section shall be inserted, namely :—

Mah. XXIII of 2001.

" *(1B)* Every person desirous of contesting election to the office of the Mayor reserved for the Scheduled Castes, Scheduled Tribes or, as the case may be, Backward Class of Citizens, shall be required to submit, alongwith the nomination paper, Caste Certificate issued by the Competent Authority and the Validity Certificate issued by the Scrutiny Committee in accordance with the provisions of the Maharashtra Scheduled Castes, Scheduled Tribes, De-notified Tribes (*Vimukta Jatis),* Nomadic Tribes, Other Backward Classes and Special Backward Category (Regulation of Issuance and Verification of) Caste Certificate Act, 2000.".

Insertion of sections 140A and 140B in Bom. LIX of 1949.

7. After section 140 of the Provincial Municipal Corporations Act, the following sections shall be inserted, namely :—

Rebate in property tax for advance payment.

" **140A.** Notwithstanding anything contained in this Act, the Corporation may, by general or special order give such rebate in the payment of property tax, as the Corporation may, from time to time decide, to any person, primarily liable for payment of the property tax, who pays such tax, before the date specified in the Bill for the purpose or, pays such tax for the entire year in advance, and different rates of rebate may be specified for different classes of user of the property.

Rebate or remission in property tax for implementing ecologically beneficial scheme.

**140B.** Notwithstanding anything contained in this Act, a rebate or remission in payment of property tax, in respect of a land and building wherein any ecologically beneficial scheme as may be identified for the purposes of this section, by the State Government or the Corporation is being implemented, shall be given at such rate as the Corporation may, by general or special order determine and different rates of rebate or remission may be specified having regard to the nature and extent of the measures adopted for implementation of ecologically beneficial scheme.

*Explanation.*—For the purposes of this section "ecologically beneficial scheme" includes rain water harvesting system, vermi composting, use of solar energy and other non-conventional sources of energy, recycling and re-use of waste water, or any scheme for promoting environment friendly and ecologically beneficial building construction or the like, as the Corporation or the State Government may identify.".

Insertion of section 152-1A in Bom. III of 1888.

8. After section 152 of the Bombay Provincial Municipal Corporations Act, 1949, the following sections shall be inserted, namely :—

Power of Corporation to grant rebate for payment of arrears of tax.

" **152-1A.** Notwithstanding anything contained in section 152 or any other provisions of this Act, the Corporation may, grant such rebate, as may be approved by the State Government, to any person or class of persons, primarily liable for payment of property tax, who pays the amount of arrears of the property tax, as per the schedule of payment fixed by the Corporation.".

## CHAPTER IV

### AMENDMENTS TO THE CITY OF NAGPUR CORPORATION ACT, 1948

Amendment of section 6 of C.P. and Berar II of 1950.

**9.** In section 6 of the City of Nagpur Corporation Act, 1948 (hereinafter, in this Chapter, referred to as " the Nagpur Corporation Act "), after clause (*b*), the following clause shall be inserted, namely :— C.P. and Berar II of 1950.

" (*b-1*) a Wards Committee ; ".

Amendment of section 20 of C.P. and Berar II of 1950.

**10.** In section 20 of the Nagpur Corporation Act, after sub-section (*2*), the following sub-section shall be inserted, namely :—

" (*2A*) Every person desirous of contesting election to the office of the Mayor reserved for the Scheduled Castes, Scheduled Tribes or, as the case may be, Backward Class of citizens, shall be required to submit, alongwith the nomination paper, Caste Certificate issued by the Competent Authority and the Validity Certificate issued by the Scrutiny Committee in accordance with the provisions of the Maharashtra Scheduled Castes, Scheduled Tribes, De-notified Tribes (*Vimukta Jatis*), Nomadic Tribes, Other Backward Classes and Special Backward Category (Regulation of Issuance and Verification of) Caste Certificate Act, 2000.". Mah. XXIII of 2001.

Substitution of section 118 of C.P. and Berar II of 1950.

**11.** For section 118 of the Nagpur Corporation Act, the following sections shall be substituted, namely :—

Rebate in property tax for advance payment.

" **118.** Notwithstanding anything contained in this Act, the Corporation may, be general or special order, give such rebate, in the payment of property tax, as the Corporation may, from time to time decide, to any person, primarily liable for payment of the property tax, who pays such tax, before the date specified in the Bill for the purpose or, pays such tax for the entire year in advance, and different rates of rebate may be specified for different classes of user of the property.

Rebate or remission in property tax for implementing ecologically beneficial scheme.

**118A.** Notwithstanding anything contained in this Act, a rebate or remission in payment of property tax, in respect of a land and building wherein any ecologically beneficial scheme, as may be identified for the purposes of this section, by the State Government or the Corporation, is being implemented, shall be given at such rate as the Corporation may, by general order or special order, determine and different rates of rebate or remission may be specified having

regard to the nature and extent of the measures adopted for implementation of the ecologically beneficial scheme.

*Explanation.*—For the purposes of this section, "ecologically beneficial scheme" includes rain water harvesting system, vermi composting, use of solar energy and other non-conventional sources of energy, recycling and re-use of waste water, or any scheme for promoting environment friendly and ecologically beneficial building construction, or the like, as the Corporation or the State Government may identify.".

12. After section 167 of the Nagpur Corporation Act, the following section shall be inserted, namely :— Insertion of section 167A in C.P. and Berar II of 1950.

" **167A.** Notwithstanding anything contained in section 167 or any other provisions of this Act, the Corporation may, grant such rebate, as may be approved by the State Government, to any person or class of persons, primarily liable for payment of property tax, who pays the amount of arrears of the property tax, as per the Schedule of payment fixed by the Corporation .". Power of Corporation to grant rebate for payment of arrears of tax.

## CHAPTER V

### AMENDMENTS TO THE MAHARASHTRA MUNICIPAL COUNCILS, NAGAR PANCHAYATS AND INDUSTRIAL TOWNSHIPS ACT, 1965.

Mah. XL of 1965. 13. In section 9 of the Maharashtra Municipal Councils, Nagar Panchayats and Industrial Townships Act, 1965 (hereinafter, in this Chapter, referred to as " the Municipal Councils Act"), in sub-section *(1),* in clause *(b),* for the word "Council" the word "Collector" shall be substituted. Amendment of section 9 of Mah. XL of 1965.

14. After section 51-1A of the Municipal Councils Act, the following section shall be inserted, namely :— Insertion of section 51-1B in Mah. XL of 1965.

" **51-1B.** Every person desirous of contesting election to the office of the President reserved for the Scheduled Castes, Scheduled Tribes or, as the case may be, Backward Class of Citizens, shall be required to submit, alongwith the nomination paper, Caste Certificate issued by the Competent Authority and the Validity Certificate issued by the Scrutiny Committee in accordance with the provisions of the Maharashtra Scheduled Castes, Scheduled Tribes, De-notified Tribes *(Vimukta Jatis),* Nomadic Tribes, Other Backward Classes and Special Backward Category (Regulation of Issuance and Verifcation of) Caste Certificate Act, 2000.". Person contesting election for reserved office of President to submit Caste Certificate . and Validity Certificate. Mah. XXIII of 2001.

Insertion of sections 127A and 127B in Mah. XL of 1965.

**15.** After section 127 of the Municipal Councils Act, the following sections shall be inserted, namely :—

Rebate in property tax for advance payment.

" **127A.** Notwithstanding anything contained in this Act, the Council may, by general or special order, give such rebate, in the payment of property tax, as the Council may from time to time decide, to any person, primarily liable for payment of the property tax, who pays such tax before the date specified in the Bill for the purpose or, pays such tax for the entire year in advance, and different rates of rebate may be specified for different classes of user of the property.

Rebate or remission in property tax for implementing ecologically beneficial scheme.

**127B.** Notwithstanding anything contained in this Act, a rebate or remission in payment of property tax, in respect of a land and building wherein any ecologically beneficial scheme, as may be identified for the purposes of this section, by the State Government or the Council, is being implemented, shall be given at such rate as the Council may, by general or special order, determine and different rates of rebate or remission may be specified having regard to the nature and extent of the measures adopted for implementation of the ecologically beneficial scheme.

*Explanation.*—For the purposes of this section "ecologically beneficial scheme" includes rain water harvesting system, vermi composting, use of solar energy and other non-conventional sources of energy, recycling and re-use of waste water, or any scheme for promoting environment friendly and ecologically beneficial building construction, or the like, as the Council or the State Government may identify.".

Insertion of sections 167A in Mah. XL of 1965.

**16.** After section 167 of the Municipal Councils Act, the following sections shall be inserted, namely :—

Power of Council to grant rebate for payment of arrears of tax.

" **167A.** Notwithstanding anything contained in section 167 or any other provisions of this Act, the Council may, grant such rebate, as may be approved by the State Government, to any person or class of persons, primarily liable for payment of property tax, who pays the amount of arrears of the property tax, as per the schedule of payment fixed by the Council.".

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई

असा. क्र. १० रजिस्टर्ड नं. एमएच/एमआर/साऊथ-२२९/२००६-०८

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

**असाधारण**

**प्राधिकृत प्रकाशन**

**गुरुवार, फेब्रुवारी १२, २००९/माघ २३, शके १९३०**

**स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.**

## भाग आठ

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम आणि विधी व न्याय विभागाकडून आलेली विधेयके (इंग्रजी अनुवाद).**

### *ERRATA*

In the English translation of the Maharashtra Municipal Corporations and Municipal Councils (Sixth Amendment) Act, 2008 (Mah.VII of 2009), published in the *Maharashtra Government Gazette*, Extraordinary, Part VIII, dated the 14th January 2009, at pages 52–57,—

on page 55,-

*(i)* in line 1 and 2, *for* "Bombay Provincial Municipal Corporations Act, 1949" *read* "Provincial Municipal Corporations Act";

*(ii)* in line 4 and 5, in the margin, *for* "Bom. III of 1888" *read* "Bom.LIX of 1949";

*(iii)* in line 30, *for* "be" *read* "by".



[किंमत : रुपये २०.००]

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.